## नि.दि.मु.नं. ६४/२०२२ मधील नि.क्र.२९ वरील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी त्यांचे विरुध्द विना कैफीयत झालेला आदेश रद्द होवून कैफीयत दाखल करणेस परवानगी मिळावी याकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, सदरील प्रतिवादी यांना दि.०६.०६.२०२२ रोजी समन्स बजावण्यात आले होते. परंतु काही महत्वाच्या कागदपत्रांकामी प्रतिवादी यांना ९० दिवसांच्या आत कैफीयत दाखल करता आली नाही. त्यांना कैफीयत दाखल करणेस ५ दिवसांचा विलंब झालेला आहे. सबब, प्रतिवादी क्र.२ ते ५ यांना कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की प्रतिवादींनी मुदतीत कैफीयत दाखल करणे आवश्यक होते. त्यांना झालेल्या ५ दिवसांच्या विलंबाबाबत प्रतिवादी यांना जास्तीत जास्त खर्चाची रक्कम आकारण्याची विनंती केली वादीने केली आहे.

४. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे युक्तिवाद ऐकले. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.२ ते ५ हे दि.१३.०६.२०२२ रोजी नि.क्र.१३ अन्वये समन्सची बजावणी झालेली आहे. तथापी, दिवाणी प्रक्रीया संहीता आदेश ८ नियम १ अन्वये प्र.वादी क्र.२ ते ५ यांनी दि. १३.०९.२०२२ पुर्वी लेखी कैफियत दाखल करणे आवश्यक होते.

५. वादीने प्रस्तुतचा दावा दावा मिळकतीबाबत दि.०३.११.२००८ रोजीच्या नोटरी विसारपावती करारनाम्याप्रमाणे व पुढील व्यवहाराचे अनषंगाने प्रतिवादींनी वादींना दावा मिळकतीचे रजिस्टर खरेदीपत्र करुन देण्याचा हुकूम होण्याकामी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ ते ४ हे दाव्यात हजर होवूनही त्यांनी मुदतीत कैफीयत दाखल केली नाही. प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले

कारण संयुक्तिक वाटत नसले तरी, दाव्याचे स्वरुप विचारात घेता तसेच दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता प्रतिवादींना सदर दाव्यात त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे योग्य होणार आहे. सबब प्रतिवादींवर खर्च लादुन कैफियत दाखल करणेस परवानगी देणे योग्य होईल. करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ ते ५ यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब त्यांचेवर खर्च रक्कम रुपये १००/– (र. रु. शंभर फक्त) लादून माफ करण्यात येत आहे.

३. खर्चाची रक्कम वादीला अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र.२ ते ५ यांची कैफीयत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

ठिकाण – वाई. (एस. एस. कुलकर्णी)
दिनांक – ०१.१२.२०२३. ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.

**प्रमाणपत्र**

याद्वारे मी असे प्रतिपादन करते की, वरील आदेश व त्याची तयार केलेली पी.डी.एफ. प्रत यातील सर्व मजकूर मूळ आदेशाशी तंतोतंत बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| आदेश दिनांक | : | ०१.१२.२०२३. |
| स्वाक्षांकित दिनांक | : | ०१.१२.२०२३. |
| टंकलेखकाचे नाव | : | एस.एस.कुंभार, लघुलेखिका नि.श्रे.. |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | : | ०१.१२.२०२३. |